“जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीय बंदराचा उरण तालुक्यातील सामाजिक आणि आर्थिक परिणामांचा भौगोलिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत(भूगोल) विषयातील पीएच.डी.पदवी करीता सादरकरावयाच्या शोध प्रबंधाची योजना.

❖ संशोधक ❖

श्री. गायकवाड आनंद किशनराव

भूगोल विभाग प्रमुख

कोकण ज्ञानपिठ वाणिज्य व कला महाविद्यालय उरण

ता. उरण, जि. रायगड

❖ मार्गदर्शक ❖

डॉ. व्हि. आर. राठोड

भूगोल विभाग प्रमुख

वसंतराव नाईक महाविद्यालय,

वसरणी, नांदेड

“जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीयबंदराचा उरण तालुक्यातील सामाजिक आणि आर्थिक परिणामांचा भौगोलिक अभ्यास”

प्रस्तावना :–

महाराष्ट्रातील ऐतिहासिक रायगड जिल्हयातील 15 तालुक्या पैकी एक तालुका देवी उरणावतीच्या नावावरून ''उरण'' हे नाव या तालुक्यास पडले सहयाद्री पर्वताच्या पश्चिम किनार पट्टीवर अरबी समुद्रातील द्विपकल्पीय स्थान उरण तालुक्यास लाभलेली असून दंतूर किनारपट्टी नैसर्गिक रित्या लाभल्याने नैसर्गिक बंदराची निर्मिती झालेली आहे.

परंपरागत भात शेतीचे आणि मिठाचे आगार म्हाणून उरणची प्रचिती आहे बदलत्या काळानुसार उरणचे भौगोलिक ,सामाजिक, आर्थिक स्वरूपही बदलत गेले. त्यातच मुबई बंदरावरील आंतरराष्ट्रीयसागरी मालाची आयात निर्यातीचा प्रचंड भार यामूळे मुंबई पासून सुमारे 10 कि.मी. अंतरावर अरबी समुद्र आणि ठाणे खाडी लगत जगप्रसिद्ध एलिफंटा (घारापुरी) बेटा जवळ कृत्रीमरित्या अत्याधुनिक अशा बंदराची निर्मिती करण्यात आली. सन 26 मे 1989 ला ''जवाहरलाल नेहरू आंतराष्ट्रीय बंदरची '' स्थापना करण्यात आली.

भारतातील आंतरराष्ट्रीयबंदरांपैकी अतिशय महत्वाचे बंदर म्हणून उदयास आले देशातील कंटेनर ची 44 टक्के हाताळणी एकटया जवाहरलाल नेहरू बंदरातून केली जाते. आधुनिक तंत्राच्या साहयाने कंटेनरची हाताळणी केली जाते. देशातील सर्वा मोठे कंटेनर तळ म्हणून लौकीक आहे

जागतिक पातळीवरील अंतर्गत सुविधा उपलब्ध असून 30 कंटेनर तळ आहेत आणि देशातील 52 कंटेनर तळासी रेल्वे व रस्ते वाहतूकीने जोडलेले आहे. तसेच जगातील अनेक आंतरराष्ट्रीयबंदराना सागरी मार्गाने जोडलेले आहे

जागतिक पातळीवरील ISO 9001: 2008, ISO 14001: 2004, OHSAS18001 : 2007, ISO 27001: 2013मानांकाने प्रमाणित आहे. JNPT,GTI आणि NSICT असे तीन प्रमुख टर्मिनल मिळुन आंतरराष्ट्रीयबंदर बणलेले आहे. महाराष्ट्रासह, गुजरात, कर्नाटक मध्यप्रदेश, उत्तर भारत इ. प्रदेशातील मालाची आयात –निर्यात केली जाते त्यामुळे देशाच्या पर्यायाने राज्याच्या आणि स्थानिक पातळीवर तालुक्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे स्थान प्रस्तुत बंदरास आहे.

..2/–

❖ संशोधनाचे महत्व :—

प्रस्तुत संशोधनाद्वारे उरण तालुक्यातील जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीय बंदरामुळे पारंपारिक भात शेती व मासेमारी करून उदरनिर्वाह करणारा समाज आज बदललेला आहे. त्यामुळे बदलत्या सामाजिक, आर्थिक, भौगोलिक परिस्थितीचे अध्ययन करणे गरजेचे आहे. शिवाय बदलत्या

परिस्थीतीनुसार त्या संबंधीत समस्या ही निर्माण झालेल्या आहेत. ज्या जाणून घेवून भविष्यात त्यावर उपाययोजना आखण्यास मदत होईल.

देशातील व त्याच प्रमाणे राज्यातील बंदराचे व्यापाराच्या दृष्टीने महत्त्व लक्षात घेता भविष्यात प्रस्तूत भौगोलिक क्षेत्रात उद्योग धंदयाची दिशा ठरविण्यास मदत होईल. प्रस्तूत विषयांवर आजपावेतो कोणीही संशोधन केलेले नसून नविन संशोधकांना संबंधित विषयावर संदर्भ उपलब्ध करून देण्यात येईल.

❖ संशोधन विषय निवड :—

स्वातंत्रोत्तर काळात भारताची आर्थिक व सामाजिक परिस्थितीत प्रचंड बदल होत गेले. देशातील पर्यायाने राज्यातील सामाजिक, आर्थिक, भौगोलिक बदल होत आहे. मोठया प्रमाणात औद्योगिकरण वाढत आहे. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठया प्रमाणात वापर केला जावू लागला. त्यात महाराष्ट्र राज्य हे आघाडीवर आहे. परदेशी व्यापारामुळे पश्चिम किनाऱ्यावरील बंदराची गरज वाढू लागली. त्यामूळे मुंबई बंदरावरील सागरी मालाची आयात—निर्यात प्रचंड वाढल्याने तो भार कमी करण्यासाठी मुंबई पासून 10 कि.मी. अंतरावरील उरण तालुक्यातील ''न्हावा—शेवा'' येथे जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीय अधुनिक बंदराची निर्मिती झाली त्यामुळे उरण तालुक्याच्या सामाजिक, आर्थिक, भौगोलिक परिस्थीतीत बदल झाला यावर आजतागायत उरण तालुक्यावरील परिणामांचा सर्वांगिण संशोधन झालेले नाही. त्यामुळे जाणिव पूर्वक संशोधकाने ''जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीय बंदराच्या उरण तालुक्यावरील सामाजिक आणि आर्थिक परिणामांचा विशेष भौगोलिक अभ्यास'' हा प्रस्तूत संशोधनाचा विषय निवडून दुर्लक्षित सामाजिक आणि आर्थिक परिणामांचा विशेष भौगोलिक अभ्यास करण्याचे नियोजीत केले आहे.

❖ संशोधन समस्या व समस्या सुत्रण :—

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या ''जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीय बंदराचे उरण तालुक्यावरील सामाजिक आणि आर्थिक परिणामांचा विशेष

भौगोलिक अभ्यास'' या संशोधन विषयाचे समस्या सुत्रण करताना सामाजिक परिणामांचा ज्यात सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक जीवनातील चांगले–वाईट परिणाम तसेच कौंटुबिक, वैवाहिक जीवन कसे आहे? त्याच प्रमाणे आर्थिक परिस्थिती कशी आहे? सामाजिक आणि आर्थिक परिणामांमुळे उरण तालुक्यातील पर्यावरणीय समस्या व अन्य इतर समस्या जसे वाहतूक, पाणी,रस्ते, विज, निवास इ... हे प्रस्तुत संशोधनाची प्रमुख संशोधन समस्या राहीली आहे.

❖संशोधन क्षेत्र :–

महाराष्ट्र राज्यातील ऐतिहासीक रायगड जिल्हयातील उरण तालुक्याचे स्थान असून 'न्हावा–शेवा' या मूळ गावी 'जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीय बंदराचे' स्थान आहे. उरण तालुक्यात 62 गावांचा समावेश आहे. (googleweblight.com) असलेल्या न्हावा–शेवाच्या मुळ क्षेत्रावर 3000 पेक्षा अधिक क्षेत्रफळाचे जवाहरलाल नेहरू बंदर स्थापीत झालेले आहे. उरणचे निरपेक्ष (भौगोलिक) स्थान 18°56' 43''उत्तर अक्षवृत्त व 72°56' 24'' पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान आहे.



जवाहरलाल नेहरू बंदर देशातील आणि परदेशातील अनेक प्रमुख बंदराला सागरी मार्गाने जोडलेले आहे. प्रस्तुत संशोधन क्षेत्राच्या उत्तरेला पनवेल दक्षिणेला मुंबई, पूर्वेला कर्जत पश्चिमोल ठाणे जिल्हयाची सिमा आहे. तालुक्याची एकूण लोकसंख्या 160,303 व क्षेत्रफळ 184 चौ. कि. मी.(ww.google web light.com)इतके आहे.

❖संदर्भ साहित्याचा आढावा :–

कोणत्याही भौगोलिक संशोधनात समस्ये बाबत पूर्वीच्या संशोधकांनी

आणि आभ्यासकांनी केलेल्या अभ्यासाचा व संशोधनाचा आढावा घेतला जाईल. प्रस्तुत संशोधन क्षेत्रातील विशेषतः उरण तालुक्यातील जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीयबंदरा संदर्भातील आढाव्यावरून प्रस्तूत संशोधन विषयात दुर्लक्षित झालेले घटक लक्षात घेवून सर्वांगीण अभ्यासाठी ती पोकळी भरून काढण्यासाठी पूर्व अभ्यासकांनी व संशोधकांच्या संशोधनपर ग्रंथांचा आणि विविध संदर्भ ग्रंथाचा तसेच शोध निबंधाचा आढावा घेण्यात येईल.

❖संशोधनाची उद्दिष्टे :–

1) उरणच्या भौगोलिक रचनेचा आभ्यास करणे.

2) उरणच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा आढावा घेणे

3) जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीयबंदराचा उरण तालुक्यावरील सामाजिक परिणामांचा अभ्यास करणे.

4) जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीयबंदराचा उरण तालुक्यावरील आर्थिक परिणामाचा अभ्यास करणे.

5) जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीयबंदरामुळे निर्माण झालेल्या पर्यावरणीय व अन्य संबंधित समस्यावर प्रकाश टाकणे.

6) उपाय योजना सुचवणे.

❖ गुहीतकृत्ये :–

1) जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीयबंदराची उरणच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका आहे.

2) जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीयबंदराची उरणच्या सामाजिक परिवर्तनात महत्त्वाची भूमिका आहे.

3) जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीयबंदरामुळे उरण तालुक्यातील नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास होत आहे.

❖संशोधनाचा आराखडा :–

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश उरण तालुक्यातील जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीयबंदराचा सामाजिक परिणामांचे वर्णन करणे असल्याने पर्यावरणीय व अन्य संबधीत समस्यांचे वर्णन करणे असल्याने त्याच प्रमाणे आर्थिक परिस्थीती संदर्भात विश्लेषण करणे असल्याने वर्णनात्मक व

सांख्यिकिय संशोधन आराखडा राहील. त्या आधारे मिळालेल्या माहीतीचे वर्गिकरण करून निष्कर्ष काढले जातील.

❖संशोधन पद्धती :–

प्रस्तूत संशोधनात संकलित तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकिय साधनाचा म्हणजे óTô चाचणीचा वापर केला जाईल. ते खालील प्रमाणे :–

Calculation Value of ótô

Formula: $t = \frac{X - M}{D}$

यावरील साधनांचा उपयोग करून सांख्यिकिय माहीती स्पष्टीकरण दिले जाईल. त्याप्रमाणे सांख्यिकिय माहीती अधिक आकलन होण्याकरिता प्रस्तूत संशोधनात स्तंभालेख, रेषालेख, वृत्तालेख इ. प्रकारच्या सांख्यिकिय तंत्राचा उपयोग केला जाईल.

❖नमुना निवड :–

प्रस्तुत संशोधन विषयाचे तथ्य संकलन करण्यासाठी 'गैर संभाव्यता नमूना निवड पद्धती अंतर्गत सहेतूक नमूना निवड' पद्धतीचा उपयोग करण्यात येईल.

उरण तालुक्यातील 20 गावातील 100 कुटूंबांचा म्हणजेच प्रत्येक गावातील 05 कुटूंबाची निवड केली जाईल. शहरी भागातील 50 टक्के कुटूंब व ग्रामिण भागातील 50 टक्के कुटूंब निवडले जातील.

❖संशोधनाची मर्यादा :–

प्रस्तूत संशोधन हे उरण तालुक्यापुरते मर्यादित आहे. सबंध तालुक्याची पहाणी करणे अधिक खर्चिक बाब असल्याने त्यामध्ये 100 कुटूंब व 20 गावे यापुरते मर्यादित आहे. जरी हे संशोधन मर्यादित असले तरी हे संशोधन सामाजिक, आर्थिक व भौगोलिक आध्यायनाकरिता उपयोगाचे असेल.

❖तथ्य संकलन :–

प्रस्तूत संशोधनाकरिता प्राथमिक आणि द्वितीयक सामग्रीचा

वापर करण्यात येणार असून त्यात उरण तालुक्यातील 100 कुटूंबाची प्रत्यक्ष पहाणी केली जाईल. एकूण 20 गावातील प्रत्येकी 05 कुटूंबाची निवड करून सामाजिक, आर्थिक, भौगोलिक परिस्थीतीचे तथ्य संकलन केले जाईल.

द्वितीयक आधार सामग्री मध्ये वेळोवेळी प्रकाशित झालेले भारत सरकार, महाराष्ट्र सरकारचे अहवाल, पोर्ट ट्रस्टचे अहवाल तसेच संशोधनासी संबंधीत संदर्भ ग्रंथ, मासिके, अहवाल, इंटरनेट इ... सामग्रीचा आधार घेवून त्यामधील माहीती उपयोगात आणली जाईल.

❖तथ्यांचे वर्गिकरण :–

प्रस्तूत संशोधन विषयासाठी विविध साधने व तंत्रा आधारे तथ्य

संकलन केल्यानंतर सदर तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी तथ्यांचे वर्गिकरण करून वर्णनात्मक आणि सांख्यकिय विश्लेषण केले जाईल व त्या आधारे निष्कर्षाची मांडणी केली जाईल. संशोधन विषयाला अनुसरून व संशोधन उद्दिष्टांच्या आधारे तथ्यांचे वर्गिकरण खालील पाच प्रकरणांमध्ये वर्गिकृत केले जाईल.

- प्रकरण पहिले :– संशोधन पद्धती

प्रस्तूत प्रकरणात संशोधन पद्धती विषयी माहीती देण्यात येईल. त्यात संशोधनाविषयी निवड, संशोधनाविषयाचे महत्त्व, समस्या व समस्या सुत्रण, संशोधन क्षेत्र, संदर्भ साहित्याचा आढावा, संशोधनाचे उद्देश, गृहितकृत्ये, संशोधन आराखडा, संशोधन मर्यादा, नमुना निवड, तथ्य संकलन, तथ्यांचे वर्गिकरण (प्रकरण निहाय मांडणी) इ... संशोधन विषयक माहिती देण्यात येईल.

- प्रकरण दुसरे :–

प्रस्तूत प्रकरणात प्रस्तावना, बंदराची व्याख्या,आंतरराष्ट्रीयबंदराचा भौगोलिक इतिहास, जगातिल प्रमुख आंतरराष्ट्रीयबंदरे (खंडनिहाय), भारतातील आंतरराष्ट्रीयबंदराचा भौगोलिक इतिहास, महाराष्ट्रातील बंदरे व महत्त्व, जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीयबंदराचे

महत्त्व व त्याचा भौगोलिक क्षेत्रावरील प्रभाव इ... घटकाची माहीती देण्यात येईल.

- प्रकरण तिसरे :–

जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीय बंदराचा सामाजिक परिणामः

प्रस्तूत प्रकरणात दोन उपघटकात विभागले जाईल.

अ) सांस्कृतिक जिवन यात भाषा, सण, उत्सव, पेहराव इ. ची माहीती देण्यात येईल.

ब) धार्मिक जीवन व राजकिय जीवन :– यात धर्म, जात, शिक्षण इ. ची माहीती देण्यात येईल तसेच स्त्री – पुरूषांचा राजकारणातील सहभाग इ. ची माहीती देण्यात येईल.या संर्वावरील जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीयबंदराचा प्रभाव याची माहीती देण्यात येईल.

- प्रकरण चौथे :–

जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीयबंदराचा आर्थिक परिणाम :

प्रस्तूत प्रकरणात रोजगार/नोकरी, व्यवसाय–हॉटेल्स, गोदामे, दुकाने, गॅरेज, मालवाहतूक, प्रवाशी वाहतूक, कंटेनर वेअर हाऊसिंग, कंटेनर तळांचे व्यवस्थापन, जमिनीच्या किंमती, शेती, पर्यावरणीय व अन्य समस्या व त्यावरील प्रभावाची माहीती देण्यात येईल.

- प्रकरण पाचवे :– निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तूत प्रकरणात वरील प्रकरणाच्या आधारे निष्कर्ष मांडण्यात येतील. त्या आधारे कांही मार्गदर्शक शिफारशी/सूचना सूचविण्यात येतील. त्याच प्रमाणे गुहीत कृत्याची पडताळणी केली जाईल.

संदर्भ ग्रंथ सुची

1) Economic Geography by Hershorn–Alexander.

2)Economic and Commercial Geography of Indoa ï Mamoria

3) Economic and Commercial Geography made simple series Rupa publication

4) Economic Geography ï K sidharth & Mudharji

5) भारताचा आर्थिक भूगाल – डॉ. कुंभारे

6) महाराष्ट्राचा व भारताचा भूगोल – ए. बी. सवदी

7) आर्थिक भूगोल– प्रा. आहिरराव, प्रा. आलिझाड, प्रा. धोपरे

8) Commercial Geography ï shinde, Telang.

9) Economic and Commercial Geography ï Mannindra Nath-Basu ï 1941

10) A Regoinal Economic Geography by ï Samuel Newton- dicken- 1949

11) रायगड जिल्हा गॅझेटियर

12) उरणचा इतिहास – वसंत भाऊ पाटील

13) www.Jnport.gov.in/highlight.aspx

14)www.Jnport.gov.in/envoronment.aspx

15) Port Trust of India-Report

16) JNPT Port Trust-Report

17) महाराष्ट्र मेरिटाईम्स बोड–अहवाल

18) बाँम्बे पोर्ट ट्रस्ट रिपोर्ट

संशोधक

श्री. गायकवाड आनंद किशनराव

भूगोल विभाग प्रमुख,
कोकण ज्ञानपीठ
वाणिज्य व कला महाविद्यालय,
ता. उरण, जि. रायगड

मार्गदर्शक

डॉ. व्हि. आर. राठोड

भूगोल विभाग प्रमुख
वसंतराव नाईक महाविद्यालय,
वसरणी, नांदेड

.